# वार्षिक अहवाल

## २०१३-१४

॥ नास्ति सेवा समो धर्मः॥

## डॉ. हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार

# वार्षिक अहवाल २०१३-१४

आपली डॉ.हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार ही संस्था दिवसें दिवस प्रगती पथावर आहे. १९८९ पासुन प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली व १९९१ साली संस्थेची नोंदणी झालेल्या छोटयाशा रोपटयाचे आज वृक्षात रुपांतरण झालेले दिसुन येते.

दर वर्षाप्रमाणे हया वर्षी सुध्दा वार्षिक अहवाल सादर करतांना संस्थेला आनंद होत आहे. मागील वर्षी ठरविलेला १००० तरुणांचा **युवा चेतना जागरण कार्यक्रम** हया वर्षी पुर्ण करण्यांत यशस्वी झालोत हे सांगतांना समाधान वाटते.

हयाच आर्थिक वर्षात आश्रमशाळेतील मुलांसाठी सुंदर असा ३००० स्के. फु. चा हॉल सुध्दा तयार करण्यांत आला त्यामुळे आश्रमशाळेतील विद्यार्थी सुध्दा प्रसन्न झालेत.

संस्थेने व संस्थेच्या वेगवेगळया युनीट ने हया आर्थिक वर्षात बरीच कामे केलेली आहेत. प्रत्यक्ष आपण भेट देवुन नक्कीच बघावीत ही विनंती. वर्षभरात झालेल्या कामांचा संक्षिप्त अहवाल आपणा समोर सादर करीत आहोत.

# डॉ.हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार

BPT REG.- F / 2268 / DHULE
SRA. REG.- MAHARASHTRA / 2439 / DHULE
80-G Certificate No. (NSK/CIT-1/80-G(5) valid from dated- 01-04-2009)

## विश्वस्त मंडळ (२००९-२०१४)

| | |
|---|---|
| श्री. कृष्णदास काशिनाथ पाटील | अध्यक्ष |
| श्री. रविंद्र गजानन बेलपाठक | उपाध्यक्ष |
| श्री. ललितकुमार बाळकृष्ण पाठक | सचिव |
| श्री. वासुदेव बळवंत राव | खजिनदार |
| श्री. रंगनाथ रुझांजी नवले | सदस्य |
| श्री. नानाभाऊ ओंकार माळी | सदस्य |
| श्री. सुरेश भालचंद्र खानापुरकर | सदस्य |
| श्री. सतिष रामकिसन माहेश्वरी | सदस्य |
| श्री. केदारनाथ रत्नाकर कवडीवाले | सदस्य |
| श्री. जत्र्या लिंबा पावरा | सदस्य |
| सौ. इंदिरा बाबुसिंग पाडवी | सदस्य |

# अ) संस्थात्मक माहिती -

A) संस्थेचे नाव - डॉ. हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार

i) रजिस्ट्रेशन क्रमांक - महा./ २४३९ / धुळे दि. १८/०९/१९९१.
- एफ / २२६८ / धुळे दि. २२/०५/१९९२.

ii) पत्रव्यवहारासाठी पत्ता - २०, इंदिरा सदन, लोकमान्य कॉलनी,
नंदुरबार फोन क्र.-०२५६४-२२३९१०,२०
Website - www.hssnandurbar.org
E-mail- hssnandurbar@gmail.com

B) अहवाल वर्षात कार्यकारीणी मंडळाच्या एकुण झालेल्या सभा - ४.

C) लेखापरिक्षकांचे नाव व पत्ता -

श्री. प्रकाश जी. पाठक
प्रकाश जी. पाठक ॲन्ड असोसीएट्स
चार्टड अकौंटंट
१६, अर्थव, विनायक नगर
वाडीभोकर रोड, देवपूर,
धुळे.


D) Bankers -

a. State Bank of India
b. Bank of India
c. Bank of Maharashtra
d. Union Bank of India
e. Jalgaon Janata Sah. Bank
f. Dhule & Nandurbar DistrictBank
g. Bank of India

## E) कर्मचारी माहिती-

| | |
|---|---|
| • डॉ. हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार | - ०२ |
| • कृषि विज्ञान केंद्र, कोळदा | - १५ |
| • National Initiative Climate Resilient Agriculture | - ०२ |
| • National Agriculture Innovation Project | - ०४ |
| • लिड क्रॉप | - ०२ |
| • प्राथमिक आश्रम शाळा जळखे | - १५ |
| • माध्यमिक आश्रम शाळा जळखे | - ११ |
| • ट्रायबल डेव्हलपमेंट प्रोजेक्ट | - ०३ |
| | ---------- |
| एकुण | - ५४ |

## F) प्रकल्प वृक्ष -




## G) अन्य हितसंबंधी संस्था -

- BAIF
- AGRICULTURAL UNIVERCITIES
- NABARD
- VARIOUS NGO`s

## ब) कार्याची माहिती

### (i) प्रकल्प, उद्देश व त्यांची कार्ये

**१. प्रकल्प - प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, जळखे**

**उद्देश -** शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करुन देणे. शिक्षणासह सुसंस्कारीत व ध्येयप्रवण पिढी उभी करणे.

**कार्य -** नंदुरबार जिल्हयातील एकुण ५२ गावांमधुन ४७३ विद्यार्थी व विद्यार्थीनींचे इ. १ ली ते इ. १० वी पर्यंतचे निवासी शिक्षण उपलब्ध.

**२. प्रकल्प - ग्रामीण उत्थान प्रकल्प (VDP)**

**उद्देश -** ग्रामीण विकासासाठी कार्य करणे व विकासाचे सुसंगत मॉडेल उभे करणे.

**कार्य -** या प्रकल्पाअंतर्गत विविध यंत्रणांनी आपापले प्रयोग, प्रात्यक्षीके, प्रशिक्षणे राबवून एकत्रित व समन्वयीत पध्दतीने ग्राम विकास करणे. हा प्रकल्प धडगाव तालुक्यात राबविला जातो.

**३. प्रकल्प - जनजाती विकास प्रकल्प (TDP)**

**उद्देश -** ग्रामीण विकासासाठी कार्य करणे व विकासाचे काल सुसंगत मॉडेल उभे करणे.

**कार्य -** प्रकल्पाअंतर्गत ५०० कुटुंबांसाठी शेतीतुन दरवर्षी उत्पन्नाची सोय करुन देणे जेणे करुन शेतकऱ्यांचे व पर्यायाने त्यांच्या पिढींचे स्थलांतर थांबविणे.

**४. प्रकल्प - राष्ट्रीय कृषि नवोन्मेषी प्रकल्प (NAIP)**

**उद्देश -** नैसर्गीक साधन संपत्तीचा वापर करुन खेडी स्वयंपुर्ण करणे.

**कार्य -** नवापूर तालुक्यातील खांडबारा समुहातील आठ गावांमध्ये नदीवर बांध बांधुन शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी मिळवून देणे व त्यातुन जमीन पाण्याखाली आणणे व भाजीपाला लागवडीतुन उत्पन्न वाढविण्यास मदत करणे.

## ५. प्रकल्प - कृषि विज्ञान केंद्र (KVK)

**उद्देश -** कृषी संबंधीचे आधुनिक तंत्रज्ञान लोकांपर्यंत पोहचविणे.

**कार्य -** संपुर्ण जिल्हयात वर्षभर विविध कार्यक्रमांच्या माध्यमातुन व प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या भेटी घेवुन शेतकऱ्यांपर्यंत तंत्रज्ञान पोहोचविण्याचे कार्य हया केंद्रामार्फत चालते. दरवर्षी ७ दिवसीय कृषी तंत्रज्ञान महोत्सवाचे आयोजन केले जाते.

## ६. प्रकल्प- शिक्षण संसाधन केंद्र (Education Resorce Center)

**उद्देश -** औपचारिक शिक्षणासोबत अनौपचारिक शिक्षणाची माहिती देणे.

**कार्य -** नंदुरबार जिल्हयातील काही पुर्व प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास करणे.

## (ii) संस्थेच्या कार्याची भौगोलिक व्याप्ती -

नंदुरबार व धुळे जिल्हा (सध्या नंदुरबार जिल्हयात कार्य सुरु आहे)

## (iv) भविष्यातील उपक्रम -

- आरोग्य सेवा
- इंग्लिश मिडीयम स्कुल

> तुम्ही जे कार्य अंगीकारले असेल त्याचे यश तुम्ही आणि तुमचे सहकारी परस्परांशी किती प्रेमाने वागता यावर अवलंबून आहे. अहंकार, विव्देष, मत्सर यांनी फार हानी होत असते. आपल्या सहकाऱ्यांची मते विधायक बुध्दीने समजुन घ्या. त्यांच्याशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करा. हेच यशाचे रहस्य आहे.
>
> **- स्वामी विवेकानंद**

# १. डॉ. हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार

डॉ.हेडगेवार सेवा समितीने अहवाल वर्षांत अनेक उपक्रम राबवलेत. विविध कामांच्या माध्यमातुन जिल्हयातील जन सामान्यांपर्यंत पोहचण्याचा संस्थेचा नेहमीच प्रयत्न असतो.

**1) जैव विवीधता कार्यशाळा -**

जैव विवीधता कार्यशाळेचे आयोजन दि.02/07/2013 रोजी कृषि विज्ञान केंद्र, कोळदा येथे करण्यांत आले. कार्यशाळेस संस्थेचे अध्यक्ष व सचिव उपस्थित होते. दिवसभर चाललेल्या या कार्यशाळेत जैव विवीधता नियमांबद्दल मार्गदर्शन करण्यांत आले.

**2) शिक्षक दिन -**

शिक्षक दिना निमित्ताने जळखे आश्रम शाळेत आज दि.04/09/2013 रोजी संस्थेचे जेष्ठ विश्वस्त श्री.रंगनाथ नवले यांच्या हस्ते श्री.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करुन शिक्षकांचा सत्कार करण्यांत आला. प्रसंगी श्री.रंगनाथ नवले यांनी मार्गदर्शन केले. सर्व शिक्षकांना संस्थेतर्फे या निमित्ताने सचिव श्री.ललितकुमार पाठक यांनी भेंट स्वरुपात पेन वाटप केलेत. कार्यक्रमांस प्रशासकिय अधिकारी श्री.बडगुजर तसेच शाळेतील सर्व विकास सहयोगी उपस्थित होते.

**3) युवा चेतना जागरण कार्यक्रम -**

एक हजार तरुणांचे एकत्रिकरण करावे असे मागील वर्षी समितीने ठरवले होते. त्या स्वप्नांस मुर्त स्वरुप 01/10/2013 रोजी मिळाले. अतिशय उत्साहाने पार पडलेल्या युवा चेतना जागरण कार्यक्रमांस संपुर्ण जिल्हयातुन 131 गावांमधुन 1003 तरुण उपस्थित होते. हा कार्यक्रम विविध 5 संस्थानी एकत्रित येवुन केला ही विशेष बाब. देशभरात हा कार्यक्रम राबवुन शेतीनिष्ठ शेतक-यांना

तसेच गावांत राहुन आपली उपजिविका भागवणा-या तरुणांना उत्साह मिळण्यासाठी संस्थेने महत्वाची भुमिका बजावली. अनेक गावांचा प्रवास करुन शेकडो शेतक-यांना प्रत्यक्षपणे संस्थेचे पदाधिकारी कार्यक्रमाच्या आधी भेटले व कार्यक्रमाचे महत्व समजवुन कार्यक्रमासाठी आमंत्रित केले होते.

4) **रक्तदान शिबिर -**

विवेकानन्द् सार्ध शती समारोह निमित्ताने संस्थेच्या कार्यालयात दि. 24/11/2013 रविवार रोजी रक्तदान शिबिर आयोजित करण्यांत आले. सदर रक्तदान शिबिरांस जनकल्याण रक्तपेढी यांचे सहकार्य लाभले. शिबिराचे उद्‌घाटन संस्थेचे कोषाध्यक्ष श्री.वासुदेव राव यांनी केले. यावेळी संस्थेचे सचिव श्री.ललित पाठक उपस्थित होते. शिबिरात एकुण 21 दात्यांनी ठरलेल्या वेळेत म्हणजेच 3 ते 5 या वेळेतच रक्तदान केले. या शिबिराची विशेष बाब म्हणजे (i) 3 रक्तदाते हे जेष्ठ नागरीक होते (ii) एकाच कुटूंबातील 3 भावडांनी रक्तदान केले. (iii) पिता पुत्रांनी रक्तदान केले. या शिबिरास जेष्ठ किर्तनकार ह.भ.प. श्री.रामभाऊ अण्णा सोनवणे यांची सुध्दा उपस्थिती लाभली. अश्या विविधतेने पार पडलेल्या शिबिरांत सहभागी झालेल्या सर्व दात्यांचे संस्थे तर्फे व्यक्तीशः आभार मानण्यात आलेत.

**5) महात्मा ज्योतिबा फुले पुण्यतिथी -**

महात्मा फुले यांच्या पुण्यतिथी निमित्ताने दि.28/11/2013 रोजी संस्थेच्या कार्यालयांत महात्मा फुले यांचे प्रतिमा पुजन करण्यांत आले. जन शिक्षण संस्थान चे लाभार्थी तसेच संसाधन व्यक्ती तसेच संस्थेतील विकास सहयोगी अशाच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

**6) डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुण्यतिथी -**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुण्यतिथी निमित्ताने प्रतिमा पुजनाचा कार्यक्रम डॉ.हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार कार्यालयात पार पडला. सचिव श्री. ललित पाठक, व कोषाध्यक्ष श्री. वासुदेव राव, श्री.संजय पाटील यांनी माल्यापर्ण केले. कार्यक्रमांस श्री.दिलीप जोशी व श्री.गोपाळकृष्ण पंचभाई याप्रसंगी उपस्थित होते.

7) **सावित्रीबाई फुले जयंती :-**

संस्थेच्या कार्यालयात जन शिक्षण संस्थानच्या प्रशिक्षणार्थी सोबत सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाप्रसंगी एका तरुण प्रशिक्षणार्थी युवती ने सावित्रीबाई फुले यांच्याबद्दल माहिती सांगीतली. कार्यक्रमांस मा. अध्यक्ष कृष्णदासभाई पाटील, मा.सचिव ललितकुमार पाठक, मा.कोषाध्यक्ष वासुदेव राव तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी व विकास सहयोगी उपस्थित होते.

9) **विवेकानंद जयंती -**

विवेकानंद यांची 150 वी जयंती निमित्ताने संस्थेतर्फे जिल्हयातील काही महानुभवांना व विद्यार्थ्यांना "***बल हेच जीवन***" पुस्तकांच्या 150 प्रती भेट स्वरुपात देण्यांत आल्या. यात संस्थेचे शहरांत वास्तव्य असणारे सदस्य, संस्थाप्रेमी तसेच सर्व विकास सहयोंगीना हया पुस्तकाचे वाटप करण्यांत आले.

**10) मातृ-पितृ पुजन दिवस -**

14 फेब्रुवारी हया दिवशी संस्था मातृ-पितृ पुजन दिवस म्हणुन साजरा करीत असते. पातोंडा येथील सरदार पटेल इंग्लिश माध्यमातील शाळेत मातृ पितृ पुजन दिवस साजरा करण्यांत आला. मातृ-पितृ पुजन दिवसाचे महत्व व्हॅलेन्टाईन दिवसापेक्षा वाढते आहे असे मत डॉ. हेडगेवार सेवा समितीचे सचिव श्री.ललितदादा पाठक यांनी मांडले.

## <u>पुरस्कार</u>

अहवाल वर्षात कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक श्री. राजेंद्र दहातोंडे यांना दिपस्तंभ चा "युवा प्रेरणा" पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

तसेच आश्रमशाळा जळखे येथील क्रीडा शिक्षक श्री. अनिल रौंदळ यांना जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालयातर्फे जिल्हास्तरिय गुणवंत क्रिडा प्रशिक्षक पुरस्काराने संन्मानित करण्यात आले.

## 11) संस्थेचा वार्षिकोत्सव अर्थात "मृद्‌गंध" -

आपल्या संस्थेचा पारिवारीक स्नेहमिलनाचा अर्थात "मृद्‌गंध" या कार्यक्रमाचे आयोजन 2 मार्च 2014 रोजी आश्रमशाळा, जळखे ता. जि. नंदुरबार येथे करण्यात आला.

या पारिवारीक स्नेहमिलनास पुणे येथील उद्योजक मा. श्री. अतुलजी नागरस हे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात सरस्वती पुजनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव मा. ललीतकुमार पाठक यांनी केले. सचिवांनी आपल्या प्रास्ताविकात संस्था स्थापनेची उद्दिष्टये, संस्थेची वाटचाल व संस्थेतील विकास सहयोगींचे योगदान या विषयी माहिती पाहुण्यांना व उपस्थितांना करुन दिली.

पहिल्या सत्राचे अध्यक्ष म्हणुन संस्थेचे जेष्ठ विश्वस्त मा. आप्पासाहेब नवले हे होते. या नंतर संस्थेतील विकास सहयोगी व बालगोपालांनी विविध कलागुणदर्शन सादर केले तसेच महिलांसाठी खेळांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या समारोपाचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष मा. कृष्णदास पाटील हे होते. समारोप कार्यक्रमात संस्थेतील विकास सहयोगी श्री. राजेंद्र दहातोंडे यांना दिपस्तंभचा युवा प्रेरणा पुरस्कार व श्री. अनिल रौंदळ यांना जिल्हास्तरिय गुणवंत क्रिडा प्रशिक्षक पुरस्कार मिळाल्याने त्यांचा सत्कार करण्यात आला. याबरोबरच शाळेतील दोन माजी विद्यार्थ्यांना जिल्हास्तरिय पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

मा. अतुलजी नागरस यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मा. प्रमुख पाहुण्यांनी संस्थेच्या विकासात "विकास सहयोगींचे" महत्व विषद केले या शिवाय संस्थात्मक बांधणीत येणाऱ्या अडचणी यावर मात कशा प्रकारे करता येईल या विषयी अत्यंत अभ्यासपुर्ण मत मांडले. तसेच मा. प्रमुख पाहुण्यांनी त्यांना देश विदेशात आलेले विविध अनुभव सर्वांसमोर विषद केले.

कार्यक्रमास संस्थेचे कोषाध्यक्ष मा. श्री. वासुदेव राव, विश्वस्त श्री. जत्र्या पावरा, सभासद मा. डॉ. गजानन डांगे उपस्थित होते. कार्यक्रमात एकुण 113 लोकांनी सहभाग नोंदविला.

# २. आश्रमशाळा जळखे -

आश्रमशाळा जळखे येथे दरवर्षी विविध कार्यक्रम होतात. हा विद्यार्थ्यांचा आनंदाचा विषय ! या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त सहभागी करण्याचा शाळेचा प्रयत्न असतो. या कार्यक्रमांच्या माध्यमातून राष्ट्रीयसण, धार्मिकसण, पर्यावरण, कार्यानुभव, अशा विविधांगी विषयांची जाणीव जागृती होत असते.

विद्यार्थ्यांमध्ये वृक्षप्रेम, श्रमप्रतिष्ठा या गुणांची रूजवण व्हावी या उददेशाने यावर्षी आश्रमशाळेच्या आवारात विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. इ. 7 वी च्या शिष्यवृत्ती परिक्षेत आश्रमशाळेतील 12 विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवले त्याबद्दल डॉ. हेडगेवार सेवा समितीच्या वतीने विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला.

आश्रमातील विद्यार्थ्यांना नवनिर्मीतीचा आनंद मिळावा या हेतूने विद्यार्थ्यांसाठी कार्यानुभव कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत सौ.प्रिती बडगुजर यांनी विद्यार्थ्यांना कागदी पिशव्या तयार करण्याचे प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षणानंतर विद्यार्थ्यांनी संस्थेच्या युवा चेतना जागरण क्रार्यक्रमासाठी एक हजार कागदी पिशव्या तयार केल्या व नंतर सुरत येथील एका संस्थेकडुन 3000 रुपये देवुन पिशव्या तयार करण्याचे काम विद्यार्थ्यांना मिळाले

**अहवाल वर्षातील कार्यक्रम -**

आश्रमशाळेत या अहवाल वर्षात खालीलप्रमाणे कार्यक्रम राबविले गेले.

(i) **जागतिक मराठी दिन -** मराठी साहित्यातील थोर साहित्यीक कविवर्य कुसुमाग्रंजाच्या स्मृतीदिनानिमित्त दि.२७ फेब्रुवारी रोजी आश्रमशाळेत मराठी दिन साजरा करण्यांत आला. याप्रसंगी इ.२ री, इ.३ री व इ.७ वीतील मुलांनी

अभ्यासक्रमांतील कुसुमाग्रजांच्या कवितांचे गायन केले. श्री.प्रमोद सुर्यवंशी, श्री.दिपक महाजन यांनी मराठी दिनाचे महत्व सांगितले.

(ii) **जागतिक गणित दिन -** दि. २२ डिसेंबर जागतिक गणित दिन रोजी निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी गणिताची बहूपर्यायी परिक्षा घेण्यात आली व त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

(iii) **राष्ट्रीय विज्ञान दिन -** राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने विज्ञानातील काही संकल्पना मांडण्यात आल्या. इ.८ वी व इ. ९ वीच्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले तसेच श्री.प्रमोद सूर्यवंशी यांनी श्रध्दा, अंधश्रध्दा व विज्ञान यातील फरक समजावुन सांगितले आणि श्री.प्रशांत खाडे यांनी वैज्ञानिकाचे कार्य सांगितले. या निमित्ताने विद्यार्थ्यांनी डॉ.सी.व्ही.रमन यांची प्रति प्रतिमा शाळेला भेट दिली.

(iv) **शिक्षक दिन (५ सप्टेंबर) -** शिक्षक दिना निमित्ताने काही विद्यार्थ्यांनी शिक्षकाची भुमिका केली. सर्व विद्यार्थ्यांचे सर्व शिक्षकांनी व मुख्याध्यापकांनी त्यांचे कौतुक केले.

(v) **निरोप संमारंभ (इ.१० वी) -** दि.२६ फेब्रुवारी २०१४ रोजी इ. १० वी च्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी शाळेला व वर्गशिक्षकांना भेट वस्तु दिल्या. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.श्री.कृष्णदासभाई पाटील व प्रमुख पाहुणे जेष्ठ शिक्षक श्री.प्रभाकर भावसार हे होते.

(vi) **जागतिक महिला दिन -** दिनांक ८ मार्च २०१४ रोजी आश्रम शाळेच्या आवरात ***जागतिक महिला दिन*** साजरा करण्यांत आला. यावेळी गावातील महिला मोठया संख्येने उपस्थित होत्या. श्रीमती ज्योती वळवी यांनी कार्यक्रमाचे औचित्य साधून महिला दिनाचे महत्व सांगितले. त्यांनतर हळदी कुंकवाचा कार्यक्रम झाला. महिलांना भेट वस्तु देण्यांत आल्या. कार्यक्रमात जळखे गावातील महिला सरपंच उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या नियोजनासाठी श्रीमती ज्योती वळवी व कु.हर्षदा वाघ यांनी परिश्रम घेतले.

(vii) **मातृ-पितृ पुजन दिवस (१४ फेब्रुवारी)-** १४ फेब्रुवारी हा दिवस "व्हॅलेनटाईन डे" म्हणुन सर्वत्र साजरा होत असतांना हा दिवस आश्रमशाळेचे विद्यार्थी "मातृ- पितृ पुजन" म्हणुन साजरा करीत असतात. या वेळी आई-वडील परप्रांतात मजुरी करायला गेलेले असतांना देखील आर्वजुन उपस्थित राहतात. आई- वडीलांचे पुजन करुन विद्यार्थी त्यांना नमस्कार करतात. त्यानंतर विद्यार्थ्यांना त्यांच्या आई-वडीलांसोबतच भोजन दिले जाते. अतिशय घरगुती वाटावा व आपल्या संस्कृतीशी नाळ घट्ट करणारा हा कार्यक्रम सर्वांनाच आनंद देणारा व हवाहवासा वाटणारा असतो. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष,मा. कृष्णदास पाटील, सचिव मा. ललीत पाठक, श्री. नाना कासार हे सपत्नीक व सुलवाडे येथील कृषि भुषण श्री रतिलालभाई उपस्थित होते.

(viii) **लायन्स क्लब - आरोग्य तपासणी शिबिर** - अहवाल वर्षात लायन्स क्लब, नंदुरबार यांच्या सोबतीने आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यांत आले. नंदुरबार शहरातील अनेक मान्यवर डॉक्टरांनी हया शिबिरांत विद्यार्थ्यांच्या आरोग्याची तपासणी केली. डॉक्टरांनी सांगितले की "जळखे आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे आरोग्य अतिशय चांगले आढळुन आलेले आहे".

(ix) **शेगांव शैक्षणिक सहल** - विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल प्रत्येक वर्षी आयोजित केली जाते. हया वर्षी ही सहल शेगांव येथे नेण्यांत आली. यांत विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोदविला. १०२ विद्यार्थ्यांनी हया सहलीचा आनंद घेतला.

ज्या माणसाच्या ठायी सत्य, पावित्र्य आणि निःस्वार्थवृत्ती या तीन गोष्टी असतील, त्या माणसाचा नाश करण्याची क्षमता विश्वातील कोणत्याही शक्तीत नाही. हया तीन गोष्टी असल्यावर अखिल विश्व जरी विरोधार्थ उभे ठाकले तरी त्याला तो एकटाच माणूस सहज तोंड देऊ शकेल.

**- स्वामी विवेकानंद**

# ३. कृषि विज्ञान केंद्र

कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार द्वारा शेती विषयक नवनवीन संशोधनाचे प्रात्यक्षिक, प्रशिक्षण केले जाते.

जिल्हयातील शेतकऱ्यांना उपयुक्त असे कृषि तंत्रज्ञान, विविध पिकांचे वाण, बियाणे निर्मिती, बचत गटांना करता येण्यासारखे कृषिउद्योग यांची प्रत्यक्ष पाहणी केंद्राच्या प्रक्षेत्रावर तसेच शेतकऱ्यांच्या शेतावर असते. कृषि विज्ञान केंद्रामध्ये माती परिक्षण, जैविक किड व रोग नियंत्रण पध्दती, प्रमुख अवजारे, जैविक खते यांच्या उत्पादनाच्या आणि प्रसाराच्या सुविधा उपलब्ध असतात तसेच मोबाईल वरुन कृषी विषयक एस.एम.एस. स्वयंचलित हवामान अंदाज देणारी यंत्रणा या सुविधा उपलब्ध असतात. दर दोन महिन्यांनी शेतकऱ्यांसाठी 'कृषक मंडळाचे' आयोजन केले जाते. त्यात शास्त्रज्ञ, प्रगतिशील शेतकरी यांचे चर्चासत्र घडवून आणले जाते.

दरवर्षी 'कृषि तंत्रज्ञान महोत्सवाचे' आयोजन केले जाते व त्यात बचत गटांच्या महिलांकरिता उद्योग परिषद, शेतकऱ्यांसाठी विविध विषयांवरील पिक परिसंवादाचे आयोजन करण्यात येते. विविध विषयातील शास्त्रज्ञ, स्वयंसेवी संस्थेचे कार्यकर्ते, कृषि अधिकारी, कृषि क्षेत्रातील विद्यार्थी, बचत गटातील महिला व पुरुष तसेच शेतकरी केंद्रास महोत्सवादरम्यान मोठया प्रमाणावर भेट देतात.

या वर्षी आठवा कृषि तंत्रज्ञान महोत्सव दि. ३० सप्टेंबर ते ०५ ऑक्टोबर २०१३ दरम्यान मोठया उत्साहामध्ये साजरा झाला. त्यात ३००० पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी, महिला, विद्यार्थी, अधिकारी, स्वयंसेवी संस्थेचे कार्यकर्ते यांनी सहभाग नोंदविला.

**<u>अहवाल वर्षातील कार्यक्रम -</u>**

१) कृषक मंडळ दर दोन महिन्यांनी कृषक मंडळाचे विविध विषयांवर चर्चासत्राचे आयोजन शेतकऱ्यांकरिता करण्यात आले. यात वर्षभरात ४०० हून अधिक शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला.

२) कृषि विज्ञान केंद्र अंतर्गत आत्मा माध्यमातून नाविन्यपूर्ण उपक्रम या घटकाअंतर्गत काही प्रात्यक्षिके घेण्यात आली त्यात -

- मिरची वाणांची चाचणी
- मिरची वाळविण्याकरिता सोलर ड्रायरचा वापर
- कृषिदूतांकरिता कृषि संदेश
- भाजीपाला लागवड

३) Convergence अंतर्गत TSP प्रयोगाकरिता विविध संशोधन केंद्र, कृषि विद्यापीठ यांच्या माध्यमातून प्रात्यक्षिके घेण्यात आली.

| अ.क्र. | सहयोगी संस्था | प्रात्यक्षिके |
|---|---|---|
| १) | कोरडवाहू संशोधन केंद्र, सोलापूर | श्रम कमी करणारे अवजारे - कोळपे, विळे, |
| २) | अजैविक स्ट्रेस प्रबंधन संस्थान, बारामती | भाजीपाला उत्पादन, आंबा उत्पादन |
| ३) | सिंचन व निचरा विभाग, म.फु.कृ.वि., राहुरी | फुले जल व्यवस्थापन तंत्रज्ञान |
| ४) | कांदा व लसूण संशोधन केंद्र, राजगुरुनगर | कांदा बिजोत्पादन व कांदा बल्ब प्रात्यक्षिके |

जिल्हयामध्ये कृषि विज्ञान केंद्राच्या माध्यमातून विविध प्रयोग सुरु आहेत.

**३-अ) शाश्वत ग्रामीण उपजिवीका सुरक्षा प्रकल्प (NAIP) :**

राष्ट्रीय कृषि नवोन्मेषी प्रकल्प अंतर्गत शाश्वत ग्रामीण उपजिवीका सुरक्षा प्रकल्प नवापूर तालुक्यातील खांडबारा परिसरातील आठ गावात राबवला. हा प्रयोग consortium पध्दतीने आमलात आणला जात असून वेगवेगळया सहा संस्था आपापली विकास विषयक संशोधन या ठिकाणी आमलात आणत आहेत.

उन्नत कृषि तंत्रज्ञान, फळबाग लागवड, पशुसंगोपन-संवर्धन, जलस्त्रोत संरक्षण-संवर्धन, प्रक्रिया उद्योग अशा विविध संशोधनांचे एकत्रित प्रयोग या ठिकाणी राबविण्यात येत आहे. वेगवेगळया प्रयोगांसाठी फळबागधारक गट, जलस्त्रोत उपभोक्ता गट असे यशस्वी समूह तयार करण्यात आले आहे.

<u>अहवाल वर्षातील कार्यक्रम -</u>

**१) विहीर खोलिकरण -** प्रकल्पांतर्गत या वर्षात एकुण ७ विहीरींचे खोलीकरण करण्यात आले. या ७ विहीरींमूळे जवळपास ३०-३५ शेतकऱ्यांना पाणी मिळण्याची सुविधा उपलब्ध झाली. आत्तापर्यंत प्रकल्पांतर्गत एकुण ४५ विहीरींचे खोलीकरण झाले असून त्यावर जलस्त्रोत उपभोक्ता गट कार्यरत आहेत. यात एकुण २२७ शेतकऱ्यांना पाण्याची उपलब्धता झाली आहे.

**२) भाजीपाला लागवड -** प्रकल्पांतर्गत १४० शेतकऱ्यांनी भाजीपाला लागवड प्रात्यक्षिकांमध्ये सहभाग घेतला यात वांगी, गवार, भेंडी, इत्यादी भाजीपाल्यांची लागवड करण्यात आली. प्रकल्पांतर्गत असलेल्या प्रात्यक्षिकांमूळे परिसरात भाजीपाला लागवड मोठया प्रमाणावर झाली असून शेतकऱ्यांना उत्पन्नाचा चांगला स्त्रोत झाला आहे.

NAIP प्रकल्पाचे हे अंतीम वर्ष होते. या प्रकल्पात अनेक यशस्वी अनुभव यांचे नोंदणीकरण झाले. स्टार चॅनेलद्वारे दूरदर्शनवरुन ABP माझा यावर खांडाबारा-NAIP प्रकल्पाचे दोन वेळा प्रसारण झाले. प्रकल्प यशस्विता पाहण्याकरिता विविध अधिकारी संस्था विद्यार्थी शेतकरी मोठया संख्येने भेट देत आहेत. त्यात या वर्षी IIT New Delhi येथील ४० विद्यार्थी, वयम संस्थेचे ५० कार्यकर्ते यांनी प्रकल्पास भेट देवून त्या विषयी माहिती घेतली.

**३-ब) जलवायु समुत्थानशील कृषिपर राष्ट्रीय पहल (NICRA) :**

हवामान बदलांचा शेतीवर होणारा परिणाम अभ्यासण्यासाठी भारतीय कृषि अनुसंधान परिषदेने 'जलवायु समुत्थानशील कृषिपर राष्ट्रीय पहल (निक्रा)' हा महत्वाकांक्षी प्रकल्प सुरु केला आहे. हवामान बदलाच्या दृष्टीने भारतातील १०० जिल्हयांमध्ये हा प्रकल्प राबविला जात आहे. नंदुरबार जिल्हयात कृषि विज्ञान केंद्रातर्फे उमराणी ता. धडगाव येथे हा प्रकल्प सुरु आहे.

हवामान बदलामुळे शेतीवर होणारा परिणामांची तीव्रता कमी करुन शाश्वत उत्पादन मिळविण्यासाठी तंत्रज्ञानाची प्रात्यक्षिके आयोजित केली जातात. या प्रात्यक्षिकांची चार घटकात विभागणी केलेली आहे. त्यात नैसर्गिक संसाधनांचे

व्यवस्थापन, पीक उत्पादन, पशुसंवर्धन आणि संस्थात्मक उपाय समाविष्ट आहेत. या प्रत्येक घटकामध्ये विविध तंत्रज्ञानांची प्रात्यक्षिके असतात.

<u>**अहवाल वर्षातील कार्यक्रम -**</u>

**१) नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन -** या घटकांतर्गत वनराई बंधारा, दगडी बांध इत्यादी प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून अनेक शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला.

२) पिक उत्पादन तंत्रज्ञान या घटकांतर्गत आंबा मोहोर संरक्षण, दिग्वीजय हरभरा वाण इत्यादी प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला.

३) **जनावरांचे व्यवस्थापन -** या घटकांतर्गत जनावरांचे लसिकरण, चारा पिक प्रात्यक्षिके, इत्यादी प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला.

४) **लोक संचलित व्यवस्था -** या घटकांतर्गत भाजीपाला उत्पादन गट, बियाणे बँक, औजारे बँक, यांची प्रात्यक्षिके घेण्यात आली.

निक्रा प्रकल्पांतर्गत Zonal Monitoring Team यांची निक्रा गावास भेट देवून पाहणी करण्यात आली. त्यात माजी कुलगुरु डॉ. पी. राघव रेड्डी, क्षेत्रीय कार्यालय हैद्राबाद चे डॉ. राजेन्दर रेड्डी, क्रीडा हैद्राबादचे डॉ. प्रसाद यांनी भेट देऊन **निक्रा गावाची निवड योग्य असुन प्रकल्पातील प्रात्यक्षिकांविषयी समाधान व्यक्त केले.**

**३-क) ग्राम उत्थान कार्यक्रम (VDP) :**

ग्रामीण विकास विषयक विविध प्रयोगांसाठी 'नाबार्ड' द्वारा ग्राम उत्थान कार्यक्रम राबवण्यात येत आहे. नंदुरबार जिल्हयातील अक्राणी तालूक्यातील शेलकूवी भोगवाडे, बोरवण ही गावे या कार्यक्रमाअंतर्गत निवडली आहे.

या गावात विविध यंत्रणांनी आपापले प्रयोग, प्रात्यक्षीके, प्रशिक्षणे राबवून एकत्रित व समन्वित पध्दतीने ग्राम विकास करावा अशी नाबार्डची संकल्पना आहे.

पीक उत्पादन तंत्रज्ञान या घटकांतर्गत दिग्वीजय हरभरा वाण, उडीद, मुग इत्यादी प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून ३० शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला.

### ३-ड) प्रमूख पिकांची उत्पादकता वाढ-पथदर्शी प्रकल्प (Lead Crop) :

ग्रामीण विकास विषयक विविध प्रयोगांसाठी 'नाबार्ड' द्वारा प्रमूख पिकांची उत्पादकता वाढ-पथदर्शी प्रकल्प राबवण्यात येत आहे. नंदुरबार जिल्हयातील नवापूर तालूक्यात खांडबारा क्लस्टरमधील एकूण १४ गावे या कार्यक्रमाअंतर्गत निवडली आहे.

या गावात प्रमूख पिके उदा. भात, सोयाबीन, तूर, रबी ज्वारी प्रयोग, या बाबत बिजोत्पादन, प्रात्यक्षिके, प्रशिक्षणे यांच्या माध्यमातून ग्रामस्तरावर पिकांची उत्पादकता वाढविणे अशी संकल्पना आहे.

| अ. क्र. | पीक | वाण | बियाणे साठवणूक (क्वि.) |
|---|---|---|---|
| १ | भात - लावणी | फुले राधा | ४.७५ |
| २ | भात - रोपण | इंद्रायणी | ९१.७७ |
| ३ | तूर - | पीटी ००१२ (राजेश्वरी) | ४.६० |
| | | **एकुण** | १०१.१२ |

या प्रकल्पात शेतकऱ्यांच्यास्तरावर बियाणे निर्मिती, बियाणे साठवणूक केली जात असुन भात बियाणे निर्मितीकरिता या गावात अत्यंत उपयुक्त वातावरण असून येत्या काळात भात निर्मिती बियाण्याचे आगार होवु शकेल असे मत इगतपुरी संशोधन केंद्राच्या शास्त्रज्ञाने व्यक्त केले.

### ३.ई) मुक्त कृषि शिक्षण केंद्र (YCMOU)

प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मितीद्वारे शाश्वत ग्राम विकासाचा प्रयत्न डॉ. हेडगेवार सेवा समिती द्वारे नंदुरबार जिल्हयात सुरु आहे. त्याचाच एक भाग म्हणुन कृषि विज्ञान केंद्रात यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक संलग्नित मुक्त कृषि शिक्षण केंद्र चालविले जाते. कृषि क्षेत्रात पदविका व पदवी पर्यंत शिक्षणाच्या १५८ विद्यार्थ्यांने अभ्यासक्रमात प्रवेश घेतला असून एकुण ०७ विद्यार्थ्यांने B.Sc. Agril. व B.Sc. Horti. शिक्षणक्रमास प्रवेश घेतला आहे.

**अहवाल वर्षातील कार्यक्रम -**

१) मुक्त कृषि शिक्षण प्रथम सत्र शुभारंभ सोहळा दिनांक ०१ ऑगस्ट २०१३ रोजी संपन्न झाला त्यावेळी दिपस्तंभ फाऊंडेशन जळगावचे मा. यजुवेंद्र महाजन, जगजीवनराम पुरस्कारप्राप्त व कृषिभूषण सिताराम दामू पाटील, योजकचे डॉ. गजानन डांगे व संस्थेचे अध्यक्ष मा. कृष्णदासभाई पाटील उपस्थित होते.

२) मुक्त कृषि शिक्षण केंद्रात विविध अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची सहलीचे आयोजन न्याहली, दोंडाईचा व धुळे या ठिकाणी करण्यात आले.

३) मुक्त कृषि शिक्षण समारोप सत्र सोहळा दिनांक १८ जानेवारी २०१४ रोजी संपन्न झाला त्यावेळी मा. सुमन रावत, अतिरिक्त जिल्हाधिकारी, नंदुरबार, कृषि महाविद्यालय दोंडाईचा चे सहयोगी अधिष्ठाता डी. आर. पाटील, संस्थेचे अध्यक्ष मा. कृष्णदासभाई पाटील, मा. प्रा. नवलेसर उपस्थित होते.

## श्रध्दांजली

अहवाल वर्षात जळखे येथील माजी सरपंच व संस्थेचे हितेशी कै. शरद पाडवी यांचे दु:खद निधन झाले.

अहवाल कार्यकाळात वेगवेगळया क्षेत्रतील तसेच संस्था परिवारातील काही मान्यवर किंवा ज्ञात अज्ञात देवाज्ञा झालेल्या व्यक्तींना भाव पुर्ण श्रध्दांजली.

## ४. वाडी प्रकल्प

खांडबारा समुहांतर्गत आठ गावांचा समावेश होतो यामध्ये बोरचक, करंजाळी, पालीपाडा, मौलीपाडा, निजामपुर, नगारे आणि निंबोणी. या गावामध्ये जुलै २००७ पासुन राष्ट्रीय कृषि नवोन्मेषी प्रकल्प राबविण्यात आला. या प्रकल्पाची यशस्वीता पाहता वाडी प्रयोग इतर शेतकऱ्यांसाठी करावा उद्देशाने वाडी प्रकल्पाची संकल्पना पुढे आली.

या प्रकल्पांतर्गत ५०० कुटुंबाचा समावेश प्रत्यक्ष वाडी लागवडीच्या प्रयोगासाठी करण्यात आली आहे. त्यामध्ये ३० आंबा आणि २६ आवळा लागवड केली जाते व या प्रयोग यशस्वी होण्यासाठी सतत पाच वर्ष इनपुट आणि तांत्रीक मार्गदर्शन दिले जाते. या सोबतच बांधावरती बांबु, गिरीपुष्प, साग व शेवगा यांचाही समावेश होतो.

या प्रयोगांतर्गत ५० भुमिहीन कुटुंबाची पण निवड करण्यात आली आहे व त्यांच्या उपजिवीकेचे साधन म्हणुन ५ शेळयांचा गट, १० अधिक १ असे कोंबडी पालन व श्रम कमी करणारे औजारे पण उपलब्ध करुन दिली जातात.

बचत गटासाठी श्रम कमी औजारांची बँक व श्रम कमी करणात्या रासायनिक धान्य प्रक्रिया बँक या माध्यमातुन उभीकरुन कुटुंब तसेच गाव स्वयंपुर्णतेचा प्रयोग एकुण सात वर्ष राबवला जाणार आहे त्या मधील हे त्या प्रकल्पाचे तिसरे वर्ष आहे.

## ५. मध्यभारत वनांचल समृध्दी योजना

काही राज्यांमधुन १० संस्थेची निवड मध्यभारत वनांचल समृध्दी योजनेसाठी करण्यांत आली त्यात आपल्या संस्थेचाही समावेश आहे. यामध्ये नंदुरबार जिल्हयामधील १०० गावांची गावाची निवड करुन गावांच्या नैसर्गिक साधन संपत्ती, गावातील सेवा सुविधा, शेती आणि रोजगार या संबंधी १०० गावांचे अध्ययन सुरु आहे. त्यापैकी ५६ गावांचे अध्ययन पुर्ण झाले.

मध्यभारत वनांचल समृध्दी योजने अंतर्गत ,खांडबारा परिसरामधील १४ गावांची एकत्रित खांडबारा परिसर विकास सेवा समिती तयार करण्यात आली. खांडबारा परिसर विकास सेवा समितीच्या निवडक ४६ सभासदांची

बारीपाडा गावाची एक दिवसीय अभ्यास सहल दि. २९/०३/२०१४ रोजी पार पडली. या दरम्यान चैत्राम पवार यांचे सोबत २ तास चर्चा करण्यात आली. यामधुन गाव विकासाचा अथक परिश्रमाचा आलेख समोर आला.

या योजने अंतर्गत नैसर्गिक साधन सामग्रीचा वापर करुन शाश्वत आजिवीका निर्माण करता यावी यासाठी योजक या संस्थेसोबत आपली संस्था नंदुरबार जिल्हयातील सर्व तालुक्यातील ३० गावांमध्ये अभ्यास करीत आहे व असा अभ्यास १०० गावांचा होणार आहे.

# ६. शिक्षण संसाधन केंद्र

**1) कै.नाना लाभे प्रथम पुण्यस्मरण :-**

अक्षर सुधारणेचा ध्यास घेतलेले मा.नानाजी लाभे यांच्या प्रथम स्मृती दिन कार्यक्रम आश्रमशाळा जळखे येथे घेण्यांत आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. रंगनाथ नवले होते. प्रमुख उपस्थिती श्री. ललितकुमार पाठक, श्री. वासुदेव राव, श्री.गजानन डांगे, श्री. ब-हाणपुरकर, श्री.विलास जोशी, श्री.संजय पाटील, श्री.प्रभाकर भावसार, श्री. नरेश शहा आदिंनी अनुभव कथन केले.

**2) विद्या भारती परिचय वर्ग :-**

विद्यमान शिक्षण व्यवस्थेतील समस्येवर चर्चा हा प्रमुख विषयाचे मार्गदर्शन विद्याभारती, दिल्ली या संस्थेचे अखिल भारतीय संघटन मंत्री मा. काशीपतीजी यांनी केले. दोन सत्रात कार्यक्रम पार पडला पहिल्या सत्रात समितीचे सचिव मा. ललीतकुमार पाठक हे उपस्थित होते. त्यात शिक्षक व मुख्याध्यापक यांचे मार्गदर्शन झाले. दुसऱ्या सत्रात नुंदरबार चे विविध 6 संस्था च्या संस्थाचालकांशी चर्चा झाली.